13 MAY 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंग्रजीची भीती दूर केल्यास सर्व क्षेत्रात करिअरच्या संधी

## नाबार्डचे माजी अध्यक्ष यशवंत थोरात : राजर्षी शाहू स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वातील विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा, कथाकथन स्पर्धेचे बक्षीस वितरण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

आत्मविश्वास बाळगून इंग्रजीची भीती दूर केल्यास राज्यातील तरुणांना सर्व क्षेत्रात करिअरच्या चांगल्या संधी खुणांवत आहेत. यात मुलींचा टक्का वाढता आहे, ही गौरवास्पद बाब आहे, असे प्रतिपादन नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात यांनी केले.




**कोल्हापूर : राजर्षी शाहू कृतज्ञता पर्वात आयोजित शालेयस्तरावरील स्पर्धांच्या बक्षीस वितरणप्रसंगी मार्गदर्शन करताना नाबार्डचे माजी अध्यक्ष यशवंत थोरात. सोबत जिल्हाधिकारी राहुल रेखावार, रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात, कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कोल्हापूर क्रीडाईचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर आदी.**

जिल्हा प्रशासनाच्या वतीने सुरु असलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्वातील उपक्रमांतर्गत विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व, प्रश्नमंजूषा, कथाकथन जिल्हास्तरीय स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ शाहू मिल येथे झाला, यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून थोरात बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, आरबीआयच्या डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात, क्रीडाई कोल्हापूरचे अध्यक्ष विद्यानंद बेडेकर, लेखक सतीश नवले आदी उपस्थित होते. यावेळी 'दिव्यांग जनव्यक्तींचे अधिकार अधिनियम -२०१६' या सतीश नवले यांनी ब्रेल लिपीत लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा, कथाकथन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

थोरात म्हणाले, स्त्री शक्ती अगाध असून प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर आहेत. आजच्या सर्व स्पर्धांमध्ये व विजेत्यांमध्ये मुलींचे प्रमाण अधिक आहे, असे सांगून विद्यार्थ्यांच्या मनातील इंग्रजीची भीती दूर करण्यासाठी पुढच्या वर्षी या स्पर्धा इंग्रजी भाषेतूनही घ्याव्यात. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिव्यांग (अंध) विद्यार्थ्यांसाठी शिवाजी विद्यापीठात ब्रेल लिपीतील विज्ञान प्रयोगशाळा सुरु करण्यासाठी प्रयत्न करु, असे सांगितले. रिझर्व्ह बँकेच्या माजी डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात म्हणाल्या, कृतज्ञता पर्वाच्या निमित्ताने राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचे आणि विचारांचे स्मरण होत असून असे उपक्रम दरवर्षी आयोजित करावेत. प्रास्ताविक माध्यमिक शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर यांनी केले तर आभार स्पर्धा समन्वयक प्रा. डॉ. कविता गगराणी यांनी मानले.

### विविध स्पर्धांचे निकाल असे :

**कथाकथन स्पर्धा :** १) अनुष्का रविंद्र जावध, किसनराव मोरे हायस्कूल, सरवडे, ता. राधानगरी, २) वैष्णवी नितीन कोकरे, इचलकरंजी हायस्कूल, ता. हातकणंगले, ३) विभा कृष्णराज शिंदे, जागृती हायस्कूल गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज.

**वक्तृत्व स्पर्धा :** १) प्रज्ञा श्रीकांत माळकर, श्री पद्माराजे विद्यालय, शिरोळ, ता. शिरोळ, २) चैतन्य, कुंडलिक कांबळे, आर. व्ही. देसाई. हायस्कूल, मिणचे खुर्द, ता. भुदरगड, ३) प्रगती बाळासाहेब गुरव, जागृती हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, गडहिंग्लज.

**प्रश्नमंजूषा स्पर्धा :** १) राधानगरी विद्यालय, राधानगरी, ता. राधानगरी, २) वडगांव विद्यालय व ज्युनिअर कॉलेज पेठ वडगाव, ता. हातकणंगले, ३) आ.ब.सरनोबत हायस्कूल, आसुर्ले–पोर्ले, ता पन्हाळा.

**जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन :** १) सानिका शिवाजी पाटील व सई सुहास जाधव, बाळासाहेब पाटील–कौलवकर हायस्कूल, कौलव :– शेती विषयक मळणी यंत्र, २) समरजीत विश्वास पवार, कौतुक विद्यालय, शिरोली :– अपघात सूचक गॉगल ३) रिषिता अभिषेक माणकापूरे व सेजल संदिप मदवाने, जनतारा कल्पवृक्ष विद्यामंदिर जयसिंगपूर :– शाहू ॲग्रो टूरिझम

**उत्तेजनार्थ :** १) अस्लम सलीम पठाण व सईद मोहसिन मुल्ला – नॅशनल हायस्कूल इचलकरंजी :– वाहतूक नियंत्रण, २) शैलेश विलास शेळके व दिगंबर पायल विपुल, डॉ. क. मालती मोहन देशी हायस्कूल, वळिवडे :– सौर ऊर्जा व आधुनिक शेती.

13 MAY 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञानाची वृद्धी उत्तराने नव्हे, तर प्रश्नाने

## डॉ. चंद्रकांत पाटील ; विद्यापीठात कृतज्ञता समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

ज्ञानाची वृद्धी ही उत्तराने होत नाही तर प्रश्नांमुळेच होते. त्यासाठी वाचन हा नित्य चिंतनाचा भाग झाला पाहिजे, असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी, अनुवादक, समीक्षक डॉ. चंद्रकांत पाटील यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित लेखक कृतज्ञता समारंभात बोलताना डॉ. चंद्रकांत पाटील. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नमिता खोत.**

शिवाजी विद्यापीठ बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्र व मराठी अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी कृतज्ञता समारंभ पार पडला. मराठीतील ज्येष्ठ कवी सतीश काळसेकर व समीक्षक डॉ. म. सु. पाटील यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या पश्चात त्यांचा अनमोल व बहुविध असा ग्रंथसंग्रह विद्यापीठास भेट दिला. त्याबद्दल कृतज्ञता समारंभ आयोजित केला होता. समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पाटील बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते.

'पुस्तकांच्या जगात' या विषयावर डॉ. पाटील यांनी विवेचन केले. ते म्हणाले, समाजसंस्कृतीच्या वाटचालीत पुस्तकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. वाचावे कसे, यावर देखील सर्वंकष चर्चा होणे गरजेचे आणि महत्त्वाचे आहे. अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, काळसेकर व पाटील यांची ग्रंथसंपदा पाहिली की त्यांची वैचारिक दृष्टी कळते. चांगले लिहिण्यासाठी चांगले वाचणे महत्त्वाचे असते.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. संचालक डॉ. नमिता खोत यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. धनंजय सुतार यांनी आभार मानले. यावेळी साहित्यिक गौतमीपुत्र कांबळे, डॉ. मेघा पानसरे, डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. एन. एम. घोटगावकर उपस्थित होते.

पुण्यनगरी

# पर्यावरणपूरक समाजप्रबोधन ध्येय अवलंबा : डॉ. शिर्के

**कोल्हापूर :** भावी पिढीचा विचार करून पर्यावरणपूरक समाजप्रबोधन करणे हेच ध्येय सेवाभावी संघटनांनी अवलंबावे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. जायंटस् ग्रुप ऑफ कोल्हापूरया ४७ व्या शपथविधी व पदग्रहण समारंभप्रसंगी ते बोलत होते. सुरेश घाटगे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. रवींद्र ओबेरॉय, अरुण नरके यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विलासराव पोवार, रामदास रेवणकर, महादेव शिंदे, सतीश बापट, अनिल माळी, मंगलाताई कुलकर्णी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रकाश क्षीरसागर यांनी केले. पंढरीनाथ पाटील यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठात आज रेशीम शेती फिरती प्रयोगशाळा लोकार्पण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**


शिवाजी विद्यापीठ सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इनक्युबेशन इन सेरीकल्चर, प्राणीशास्त्र विभाग यांच्या वतीने जिल्हा नियोजन समितीच्या रेशीम शेती फिरती प्रयोगशाळेच्या लोकार्पण कार्यक्रमाचे शुक्रवारी (दि.१३) दुपारी चार वाजता विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात आयोजन केले आहे. पालकमंत्री सतेज पाटील यांच्या हस्ते व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली लोकार्पण कार्यक्रम होईल. यावेळी प्र-कुलगुरू डॉ.पी. एस. पाटील, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, जिल्हा नियोजन अधिकारी विजय पवार, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रकल्प प्रमुख डॉ. ए. डी. जाधव, प्राणीशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. ए. ए. देशमुख यांनी केले आहे.

जनसंपर्क [illegible]
13 MAY 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रश्नाने होते ज्ञानाची वृध्दी : डॉ. चंद्रकांत पाटील

प्रतिनिधी
कोल्हापूर

ज्ञानाची वृद्धी ही उत्तराने नाही तर प्रश्नाने होते. वाचन चिंतनाचा भाग झाला पाहिजे. वाचावे कसे, यावर देखील चर्चा होणे महत्त्वाचे आहे, असे मत समीक्षक डॉ. चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कार्यक्रमात बोलताना डॉ. चंद्रकांत पाटील. सोबत डॉ. रणधीर शिंदे, डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नमिता खोत.

शिवाजी विद्यापीठमधील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र आणि मराठी विभागांच्या संयुक्त विद्यमाने कृतज्ञता समारंभ झाला. ज्येष्ठ कवी सतीश काळसेकर व समीक्षक डॉ. म. सु. पाटील यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्या पश्चात त्यांचा ग्रंथसंग्रह विद्यापीठास भेट दिला. यावेळी समीक्षक डॉ. पाटील प्रमुख पाहुणे म्हणून 'पुस्तकांच्या जगात' या विषयावर बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काळसेकर व पाटील यांची ग्रंथसंपदा पाहिली की त्यांची वैचारिक दृष्टी आपल्याला कळते. चांगलं लिहिण्यासाठी चांगलं वाचलं पाहिजे, असे सांगितले.

प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. ग्रंथपाल डॉ. नमिता खोत यांनी प्रास्ताविक केले. मराठी विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. धनंजय सुतार यांनी आभार मानले. गौतमीपुत्र कांबळे, डॉ. नंदकुमार मोरे, प्रा. एन. एम. घोटगावकर आदी उपस्थित होते.

लोकमत

# रेशीम शेती फिरती प्रयोगशाळेचे आज लोकार्पण

कोल्हापूर : सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इन्क्युबेशन इन सेरीक्लचर आणि प्राणीशास्त्र अधिविभागाच्या रेशीम शेती फिरती प्रयोगशाळेचे लोकार्पण आज, शुक्रवारी दुपारी ४ वाजता पालकमंत्री सतेज पाटील यांच्या हस्ते होणार आहे. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, जिल्हा नियोजन अधिकारी विजय पवार प्रमुख उपस्थित असतील.

13 MAY 2022 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांतूनच सक्षम नेतृत्व घडेल : कुलकर्णी



पाचगणी : शिवाजी विद्यापीठातर्फे बहाई ॲकॅडमीमध्ये आयोजित नेतृत्व विकास शिबिराचे उद्घाटन करताना अमित कुलकर्णी. सोबत मान्यवर.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सरकारने विद्यार्थी निवडणुका निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी चांगला कायदा तयार केला आहे. त्याची अंमलबजावणी झाल्यास विद्यार्थ्यांमधून सक्षम नेतृत्व पुढे येईल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी यांनी व्यक्त केला. विद्यापीठाचा विद्यार्थी विकास कक्ष, नेतृत्व विकास केंद्र आणि बहाई ॲकॅडमी यांच्या वतीने पाचगणी येथे आयोजित नेतृत्व विकास शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

शिबिरात सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी सहभागी होते. यामध्ये डॉ. गुरव, सातारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अभय कुमार बन्सल, बहाई ॲकॅडमीचे संचालक लेसन आझादी, नेतृत्व विकास केंद्राचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, नवनाथ बोंबले, डॉ. संजय ठिगळे, प्रा. कबीर खराडे, पुणे येथील प्रशांत साठे, डॉ. ए. पी. कुलकर्णी, रुसाचे वरिष्ठ सल्लागार प्रमोद पाबरेकर, शहाजी लॉ कॉलेजचे डॉ. प्रवीण पाटील, आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाली, डॉ. जी. एस. राशिनकर, मुंबई विद्यापीठाच्या सांस्कृतिक विभागाचे समन्वयक नीलेश सावे यांनी मार्गदर्शन केले.

13 MAY 2022
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक प्रक्रियेतून मातृभाषेचा विकास

## वामन पंडित; 'विवेकानंद'मध्ये दुसरे राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १२ : शैक्षणिक प्रक्रियेत मातृभाषा विकसित होते, असे मत ज्येष्ठ कवी वामन पंडित यांनी आज येथे व्यक्त केले. विवेकानंद महाविद्यालयातील वाङ्मय मंडळातर्फे आयोजित दुसऱ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी झाडांच्या कवितांचे वाचन केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थानी होते. बापूजी साळुंखे सभागृहात संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

पंडित म्हणाले, 'विविध छंद जोपासल्याने जीवनात सर्जन व सृजनशीलतेला वाव मिळतो. नव्या पिढीचे साहित्य विद्यार्थ्यांनी वाचावे. मातृभाषेत जेवढे व्यक्त होता येते, तेवढे दुसऱ्या भाषेमध्ये व्यक्त होता येत नाही. मातृभाषेच्या विकासासाठी जास्तीत जास्त वाचन व लेखन करणे गरजेचे आहे.'

साळुंखे म्हणाले, 'साहित्य माणसाला जगण्याचे भान देते. मराठी साहित्याला संत साहित्याची परंपरा लाभली आहे. याचबरोबर पंडिती आणि शाहिरी काव्याने मराठी साहित्याला समृद्ध केले. ज्ञानदेवांपासून ते समकालीन साहित्याचा विचार करणे काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासून ज्ञानात भर घातली पाहिजे.'



**कोल्हापूर : दुसऱ्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन युवा साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना ज्येष्ठ कवी वामन पंडित. शेजारी प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, समन्वयक डॉ. प्रभा पाटील.**

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार म्हणाले, 'महाविद्यालयीन युवकांच्या साहित्यप्रज्ञेचा शोध घेण्याचा आणि नवोदितांच्या सर्जनशीलतेला मुक्त व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न संमेलनातून केला आहे.'

लेखिका डॉ. सुनीता बोर्डे यांची प्रकट मुलाखत विद्यार्थ्यांनी घेतली. त्यांनी साहित्य प्रवासाची व कादंबरीच्या जन्माची कथा सांगितली. डॉ. कविता तिवडे यांनी त्यांचा परिचय करून दिला. कवी डॉ. जयप्रभू कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली युवा कविसंमेलन झाले. यावेळी त्यांनी कविता सादर केल्या. डॉ. स्वप्नील बुचडे यांनी त्यांचा परिचय करून दिला. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आरिफ महात यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी विद्यापीठ युवक महोत्सव विजेत्या संघातील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष विद्यार्थी प्रतिनिधी तेजस गुरव होते.

संमेलनाचा प्रारंभ शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे समाधी परिसरातून ग्रंथदिंडीने झाला. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील, सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे व ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी संयोजन केले.


आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, डॉ. दीपक तुपे, डॉ. वाय. डी. हरताळे, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी, संदीप पाटील, डॉ. सलमा मणेर, प्रा. माधुरी पवार, प्रा. नम्रता ढाळे यांच्यासह गोवा, कर्नाटक व महाराष्ट्रातील विद्यार्थी उपस्थित होते. समन्वयक डॉ. प्रभा पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रदीप पाटील यांनी आभार मानले. प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले.


सकाळ

# निमशिरगाव साहित्य संमेलनाचे पुरस्कार जाहीर

## पुसदकर, व्ही. एन. शिंदे, सावंत यांचा समावेश


डॉ. पुसदकर


डॉ. शिंदे


डॉ. सावंत

**दानोळी, ता. १२ :** निमशिरगाव (ता. शिरोळ) येथील ग्रामस्थ आणि साहित्य सुधा मंचतर्फे प्रतिवर्षी दिल्या जाणाऱ्या समाजरत्न, साहित्यरत्न आणि शेतकरी राजा पुरस्काराची आज येथे घोषणा केली. आदिवासी समाजात काम करणारे ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रभाकर पुसदकर (वर्धा) यांना दे.भ.पद्मश्री डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार समाजरत्न पुरस्कार, विज्ञानविषयक लेखन करणारे डॉ. व्ही. एन. शिंदे (कोल्हापूर) यांना पी. बी. पाटील साहित्यरत्न पुरस्कार, तर कृषी क्षेत्रात नावीन्यपूर्ण काम करणारे ज्येष्ठ संशोधक आणि दापोलीच्या बाळासाहेब सावंत कोकण विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एस. डी. सावंत यांना शेतकरी राजा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यंदाच्या रौप्यमहोत्सवी ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील, अशी माहिती आज पुरस्कार निवड समितीतर्फे साहित्य सुधा मंचचे अध्यक्ष पद्माकर पाटील, पत्रकार रावसाहेब पुजारी, प्रा. शांताराम कांबळे, अजित सुतार व गोमटेश पाटील यांनी दिली.

समाजकारण, साहित्य आणि कृषी क्षेत्रात काम करणाऱ्यांना गेली १२ वर्षे हे तीन पुरस्कार निमशिरगाव येथे होणाऱ्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात प्रदान केले जातात. यंदाचे रौप्यमहोत्सवी व दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या ३२ व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात २८ मे रोजी सकाळच्या उद्‌घाटन सत्रात प्रदान करण्यात येतील. महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष कुमार सप्तर्षी, यंदाच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष व निमशिरगावच्या संमेलनाचे उद्‌घाटक भारत सासणे व संमेलनाध्यक्ष डॉ. आनंद पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

13 MAY 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात 'गांधी विचार: आकलन व औचित्य' वर कार्यशाळा

प्रतिनिधी
कोल्हापूर

जातीय आणि धार्मिक सलोख्याचे वातावरण बिघडविण्यासाठी सत्ताधारीच प्रयत्नशील आहेत. महात्मा गांधींनी आयुष्यभर अशा कुरापतखोर राज्यकर्त्यांचा विरोध केला, असे प्रतिपादन डॉ. अशोक चौसाळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्र आयोजित गांधी विचार : आकलन व औचित्य या विषयावर आयोजित केलेल्या कार्यशाळेच्या पहिल्या सत्रामध्ये ते बोलत होते. 'गांधी विचार : समकालीन संदर्भ" असा त्यांच्या विषय होता. मानव्यशास्त्र सभागृहामध्ये आयोजित केलेल्या या कार्यशाळेच्या प्रारंभी 'गांधी विचार : आकलन व औचित्य" या त्रिखंडात्मक ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. अरुण भोसले व प्रसिद्ध वक्ते किशोर बेडकिहाळ यांच्या हस्ते केले.

या त्रिखंडात्मक ग्रंथाचे संपादन बेडकिहाळ, डॉ. चौसाळकर व रमेश ओझा यांनी केले आहे. प्रकाशनानंतर बोलताना डॉ. भोसले म्हणाले, 'गांधी विचार हे साचेबद्ध आणि बंदिस्त नाहीत तर ते प्रवाहित व मानव जातीच्या प्रगतीसाठी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरत आहेत. केंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील डॉ. चैत्रा रेडकर यांनी तिन्ही खंडावर मनोगत व्यक्त केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रामध्ये बेडकिहाळ यांनी गांधींची धर्मकल्पना आणि आजचे वास्तव, तर तिसऱ्या सत्रामध्ये गांधीजींचा राष्ट्रवाद या विषयांवर डॉ. चैत्रा रेडकर यांनी तर चौथ्या सत्रात विजय तांबे यांनी चौथी औद्योगिक क्रांती या विषयाची मांडणी केली. डॉ. सचिन भोसले यांनी सुत्रसंचालन केले. डॉ. शिवाजी पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
13 MAY 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांमधून सक्षम नेतृत्व घडेल

प्रतिनिधी
कोल्हापूर

सर्वसमावेशक नेतृत्वावर समाजाची प्रगती अवलंबून असते. या दृष्टीकोनातून सरकारने विद्यार्थी निवडणुका निर्भय आणि निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी एक चांगला कायदा तयार केला आहे. या कायद्याची अंमलबजावणी झाल्यास येत्या काळात विद्यार्थ्यांमधून सक्षम नेतृत्व पुढे येईल, असा विश्वास शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास कक्ष, नेतृत्व विकास केंद्र आणि बहाई ॲकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने पाचगणी येथील आयोजित तीन दिवसीय नेतृत्व विकास शिबिराचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव म्हणाले, विद्यार्थीच्या कल्याणाच्या आणि हिताच्या दृष्टीने विद्यापीठाने अनेक योजना हाती घेतल्या आहेत असे सांगितले. बहाई ॲकॅडमीचे लेसन आझादी म्हणाले, नेतृत्व विकास शिबिरातून मिळणाऱ्या ज्ञानातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात निश्चितपणे सकारात्मक बदल होईल. सातारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अभय कुमार बन्सल, नेतृत्व विकास केंद्राचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव , नवनाथ



**कोल्हापूर : शिबिराचे उद्घाटन करताना विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी. सोबत राजन सावंत, डॉ. आर. व्ही. गुरव, लेसन आझादी, डॉ. शिवाजी जाधव आदी.**

■ **राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अमित कुलकर्णी यांचा विश्वास**

बोंबले, डॉ. संजय ठिगळे, प्रा. कबीर खराडे, पुणे येथील प्रशांत साठे. डॉ. जी. एस. राशिनकर यांनी संवाद कौशल्ये आदींनी मार्गदर्शन केले. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. पी. जी. कुंभार यांच्या हस्ते या शिबिराचा समारोप झाला. बहाई अकॅडमीचे पराग तांदळे यांनी स्वागत केले.

Times of India

# SUK extends admission deadline

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has extended the admission dates to May 31 for students opting for various graduate and postgraduate courses.

SUK's deputy registrar Dr V N Shinde said, "Admission process has started for the academic year 2022-2023 for MSc, BSc, MA in Mass Communication, MA in Russian, MTech. (Yashwantrao Chavan School of Rural Development), among other courses."

He added, "The deadline for filling the application form for the academic year 2022-2023 ended on May 10. But now due to some reasons this deadline has been extended till May 31 for the benefit of the students." Students can fill the application form by visiting the link http://www.unishivaji.ac.in/mscadmission/Admission-2022-2023.